औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय


कामगार भवन, ५ वा मजला, ब्लॉक - ई, सी-२०, वान्द्रे-कुर्ला संकुल, वान्द्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१

दुरध्वनी क्र.२६५७२५०४/०९/२२/५८ Email- dirdish.mum-mh@gov.in

Website-www.mahadish.in


---

क्र. औसुवआ/वैद्यकीय/ ७९ ८३ /१०,

दिनांक :- 19 JUN 2024

## परिपत्रक क्र. १६

विषय :- कामगारांच्या वैद्यकीय तपासणीबाबत.

संदर्भ :- १. शासन निर्णय क्रमांक एफएसी-२०२३/प्र.क्र.२९८/काम-४, दि.२९/०२/२०२४.

२. शासनाचे पत्र क्रमांक एफएसी-२०२३/प्र.क्र.२९८/काम-४, दि.१४/०६/२०२४.

सर्व अपर / सह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य यांना सूचित करण्यात येते की, संदर्भिय शासन निर्णय क्रमांक १ व २ अन्वये प्राधिकृत प्रमाणक शल्य चिकित्सक यांनी कारखान्यातील कामगारांची वैद्यकीय तपासणी करण्याकरीता अटी व शर्ती निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णयानुसार कारखान्यातील कामगारांची वैद्यकीय तपासणीबाबतची माहिती संचालनालयास पारदर्शकपणे तात्काळ उपलब्ध होण्याकरीता ऑनलाईन प्रणाली ( Online portal and mobile application ) विकसित करण्यात आली आहे.

कारखान्यातील कामगारांची वैद्यकीय तपासणीची सूचना आणि तपासणीनंतरची माहिती संबंधित प्राधिकृत प्रमाणक शल्य चिकित्सक यांनी या ऑनलाईन प्रणालीद्वारे संचालनालयास देणे बंधनकारक करण्यात आली आहे. तरी आपल्या विभागातील सर्व कारखान्यांना सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आली असून त्याद्वारे वैद्यकीय तपासणीची माहिती संबंधित प्रमाणक शल्य चिकित्सक यांनी कळविणे बंधनकारक आहे आणि त्याशिवाय करण्यात आलेली वैद्यकीय तपासणी संबंधित शासन निर्णयानुसार ग्राह्य धरण्यात येणार नाही असे अवगत करण्यात यावे.

( दिपक पोकळे )
संचालक
औद्योगिक सुरक्षा व आरोग्य,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.
( अतिरिक्त कार्यभार )

प्रत :-

१. अपर / सह / उप संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, मुंबई /नागपूर / पुणे (कार्यक्षेत्र क्र. १,२,३)/ ठाणे/ कल्याण/ रायगड/ वसई/ पालघर/नाशिक/सातारा/ कोल्हापूर/छत्रपती संभाजीनगर/जळगाव/ धुळे/अहमदनगर/ सोलापूर/ सांगली/ रत्नागिरी/चंद्रपूर/भंडारा/अकोला/अमरावती/नांदेड

२. सर्व प्राधिकृत प्रमाणक शल्य चिकित्सक.

Scanned with CamScanner